# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०५/०९/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## अवैध अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध खापरखेडा पोलीसांची कार्यवाही

दि. ०४/०९/२०२४ रोजी खापरखेडा येथील पोलीस स्टाफ पोलीस स्टेशन ला हजर असतांनी विश्वनीय माहीती मिळाली की प्रतिक नायडु रा. वार्ड क्र ०२ सिल्लेवाडा हा आपल्या घरी देशी कट्टा (माउजर) ठेवले आहे. अशी माहीती मिळाल्याने खापरखेडा पोलीसांनी लगेच सिल्लेवाडा येथुन प्रतीक प्रकाश नायडु यास ताब्यात घेवुन देशी कट्टा (माउजर) बाबत सखोल विचारपुस केली असता प्रतीक नायडु हा उडवा उडविचे उत्तरे देवु लागला तेव्हा पोलीसांनी त्यास विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्याने सांगितले की त्याने त्याचे घरी एक लोखंडी रिवॉल्वर व राउड लपवुन ठेवलेले आहे. असे सांगताच खापखेडा पोलीसांनी पंचाना घेवुन प्रतीक नायडु यांचे घरी गेलो असता प्रतीक नायडुने आपल्या घराचे मागील अंगनातील पाण्याचे ड्रमचे मागुन एका प्लास्टीक पिशवी मधुन एक लोंखंडी रिवॉल्वर व ०६ काडतुस (बुलेट) असा एकुण ४१,०००/— रुपयाचा माल जप्त केला.सदर गुन्हयाबाबत फिर्यादी नामे— पोउपनि आरती नरोटे यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सपोनि खाडे हे करीत आहे. पोस्टे खापरखेडा यांनी २०२४ मध्ये एकुण १२ अवैध अग्नीशस्त्र बाळगण्या प्रकरणी गुन्हे दाखल केले आहे.

सदरची कार्यवाही हे मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ मा. उपविभागीय अधिकारी संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनात पोनी अरंविद कतलाम यांचे नेतृत्व म.पो.उप.नी आरती नरोटे, प्रफुल राठोड, शैलेश यादव, कविता गोंडाने, मुकेश वाघाडे, राजु भोयर, राजकुमार सातुर, यांनी केली आहे.



# एनडीपीएस गुन्हयात गांजाची वाहतुक करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :— दिनांक ०३/०७/२०२१ चे १९/१६ वा. दरम्यान फिर्यादी पोउपनि आशिश मोरखडे पो.स्टे. बुट्टीबोरी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अप. क्र. २८९/२१ कलम २०, २२ एनडीपीएस ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/०७/२०२१ चे १५/३० वा. ते १७/१० वा. दरम्यान यातील फिर्यादी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे कार्यालयीन कामकाज करीत असताना गुप्त बातमीदारानी माहिती दिली की एक ईसम दिल्ली येथून फिक्कट निळसर रंगाचे टोयोटा कंम्पनी चे कार क्रमांक डील ०७ सिजी ४३४१ मधुन मोठया प्रमाणात अंमली पदार्थ बुट्टीबोरी मार्ग नागपुर येत व्रिकी करीता घेवुन येत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळल्याने कायदेशिर नोंद घेवून पोलीस स्टॉफ सह चंद्रपुर ते नागपुर नाका बंदी करून सदर वाहन थांबवून झडती घेतली असता सदर ईसम याचे पॅन्टचे खिशामधुन नगदी १,०००/रू मिळुन आले. तसेच टोयोटा कंम्पनी चे कार क्रमांक —डीएल ०७ सीजी ४३४१ वाहनाचे मागील सीटचे आतून तयार केलेल्या बॉक्स टयुब भागात क्र.०१ कि.६,९५,००० रू ३५ नग खाकी रंगाचे प्लॅस्टीक सेलोटेपने सिलबंद व पॅकींग असलेले बंडलमध्ये मध्ये गुंगीकारक वनस्पती ओलसर/दमट गांजा ज्यामध्ये एकुण ६८,११० ग्रॅम (६८ किलो ११० ग्रॅम गांजा ) व खाकी रंगाचे वे टन आतुन निळया रंगाचे प्लॅस्टीक असलेले एकुण ३५ नग खाली वे टनाचे वजन १ किलो ३९० ग्रॅम सह एकुण ६९ किलो ५०० ग्रॅम गांजा १०,०००/रू प्रती किलो प्रमाणे जे पांढरा रंगाचे चार प्लॅस्टीक बोरी मध्ये वेगवेगळ गांजा भरून केलेले वजन मध्ये १९ किलो ८४० ग्रॅम गांजा ज्यात खाली बोरीचे वजन ०.१६८ ग्रॅम. २) मध्ये १७ किलो ८६० ग्रमॅ गांजा ज्यात खाली बोरीचे वजन ०.१५६ ग्रॅम ३) मध्ये १६ किलो ६३० ग्रॅम गांजा ज्यात खाली बोरीचे वजन ०.१५९ ग्रॅम ४) मध्ये १४ किलो मध्ये १३० ग्रॅम गांजा ज्यात खाली बोरीचे वजन ०.१७३ ग्रॅम २) कि.१०,०००/रू आरोपी यांचे ताब्यातील एक समॅसग कपंनीचा निळया रंगाचा स्मार्ट मोबाईल आयएमआय क्र.३५१७१५११४५९२६८४ ३) कि.१०००/रू आरोपी यांचे ताब्यातील नगदी १०००/रूपये.) ४) कि.५,००,०००/रू एका फिक्कट निळसर रंगाचे टोयोटा ॲल्टीस कंपनीचे कार क्र. डीएल ७ सीजी ४३४१ ५) कि.००/रू एका पिवळसर रंगाचे प्लॅस्टीक वॅलीत ३५ नग खाली वे टन ज्याचे प्लॅस्टीक थैलीसह वजन १ किलो ४७० ग्रॅम असा एकुण किमंती १२,०६,०००/रू चा माल जप्त करून आरोपी विरूध गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि सतीश सोनटक्के सो. यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी.जे. ०७ नागुर सो. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०५/०९/२०२४ रोजी मा. डी. जे.०७ नागुर सो. यांनी वरील नमुद आरोपीला गुन्हयात कलम २० एनडीपीएस ॲक्ट मध्ये १२ वर्ष सश्रम कारावास व १,००,०००/— रू दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी पांन्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार सफौ अनिल व्यवहारे पो.स्टे. बुटटीबोरी यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**